# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**खामगांव (जि.बुलढाणा) येथील तहसील कार्यालयातील तहसीलदार, कनिष्ठ लिपीक, अव्वल कारकून, तलाठी व शिपाई यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१) ९२८ (२२-१२-२०१४). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) येथील तहसील कार्यालयातील तहसीलदार,कनिष्ठ लिपीक, अव्वल कारकून, तलाठी व शिपाई यांची पदे रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हि पदे रिक्त असल्यामुळे सामान्य नागरीकांचे तहसील कार्यालयातील कामे ठप्प झाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु रिक्त पदे भरण्यासंबंधी वारंवार मागणी करुन सुध्दा पदे न भरण्याची कारणे काय,

(४) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्यासंबंधी शासन तात्काळ काही उपाय योजना करणार आहे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०१-२०१६) :**(१), (२), (३) व (४) खामगांव जि.बुलडाणा येथील तहसिल कार्यलयातील नायब तहसिलदारांचे ३ पदे, कनिष्ठ लिपिकांचे १ पद, अव्वल कारकूनाचे १ पद तलाठ्याची ५ पदे व शिपाईचे १ पद अशी एकूण ११ पदे आज रोजी रिक्त असून त्या पदांवरील कर्मचाऱ्यांची कामे अन्य कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्यात येत आहेत, सदर पदे पदोन्नती, बदली, सेवा निवृत्ती इ. कारणामुळे नुकतीच रिक्त झालेली असून सदर रिक्त पदे नियमानुसार पदोन्नतीने अथवा भरती प्रक्रिया राबवून भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

## कोल्हापूर येथील बिगरशेती आदेशाची नोंद दप्तरी घेण्याबात

**(२) १९७२ (२२-१२-२०१४). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी डी.डी. वळवी यानी सन २००६ ते २००८ या कालावधीत दिलेल्या बिगरशेती आदेशांना ग्राहय न मानता, खरेदी - विक्री व्यवहारांची नोंद सातबारा पत्रकी करणे बंद करण्यात आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशांची नक्कल आजसुध्दा कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडील हुजूर रेकॉड मधून उपलब्ध होत असतानाही हातकंणगले तालुक्यात खरेदी-विक्री व्यवहाराची नोंद थांबिवण्यात आल्यामुळे हजारो नागरीकांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नोंदी थांबवण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर नोंदी पुर्ववत सुरु करणेबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६) :**(१), (२) व (३) तहसिलदार शिरोळ यांचेकडे श्री.मनोजकुमार हरिशचंद्र सपकाळ यांनी दिनांक १५/१२/२०१२ रोजी अर्ज देवून सन २००८ साली पारित करण्यात आलेल्या बिगरशेती आदेशाची नोंद दप्तरी होणेबाबत मागणी केली होती. सदर प्रकरणी पारित सनद व महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील अनुसूची सहा-ब (नियम-११क) यामध्ये तफावत आढळून आल्याने अशास्वरुपाच्या बिनशेती आदेशाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सत्यता तपासून घेतलेखेरीज त्याबाबतच्या नोंद तालुका दप्तरी घेण्यात येऊ नये. असे अप्पर जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी दिनांक ०३/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये सर्व तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांना कळविले आहे. त्यानुसार सत्यता पडताळणीबाबत तहसिलदार कार्यालयाकडून पाठविण्यात येणाऱ्या प्रकरणाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयातील अभिलेखाच्या आधारे सत्यता पडताळून प्रकरण परत्वे यथायोग्य निर्णय घेण्यात येत आहे.

---

## सातारा जिल्हयात वाठार येथील नवीन बसस्थानकाचा वापर होत नसल्याबाबत

**(३) ४७३२ (१५-०१-२०१५). श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयात वाठार येथे सुमारे ८० लाख खर्च करून नवीन बसस्थानकाची उभारणी करून त्या बसस्थानकाचा एक वर्षापासून वापर होत नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर बस स्थानकाचा सद्य:स्थितीत वापर मद्यपी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर बसस्थानकाचा वापर व्हावा म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२१-०४-२०१६) :**(१) व (२) हे अंशतः खरे आहे.

सदर बसस्थानक ३ फलाटांचे असून ते जून, २०११ मध्ये सुमारे रु.३२.०० लाख खर्चून बांधण्यात आले आहे.

दि. २७.०४.२०१२ रोजी सदर बसस्थानकावरुन वाहतूक सुरु करण्यात आली. सदर बसस्थानक हे वाठार रेल्वे स्टेशनपासून १.८ कि.मी. अंतरावर गावाच्या बाहेर लोणंद-फलटण-सातारा मार्गावर असल्यामुळे त्याचा परिणाम स्थानिक बाजारपेठेवर होऊ लागल्याने प्रवाशांना ये-जा करणे गैरसोयीचे होत असल्यामुळे ग्रामपंचायत व स्थानिक नागरीकांनी विरोध केल्यानंतर पुर्ववत वाठार रेल्वे स्टेशन येथून वाहतूक सुरु केल्यामुळे सदर बसस्थानक वापरात नाही.

(३) व (४) दि.१.२.२०१५ पासून नवीन बसस्थानकावर वाहतूक नियंत्रक यांची नेमणूक करुन बसस्थानकाचा वापर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहेत. बस स्थानकाची तपासणी केली असता सदर बसस्थानकाचा वापर मद्यपी करीत नसल्याचे आढळून आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उरण (जि.रायगड) येथे शेतकऱ्यांच्या जमिनीत परवानगी न घेता गॅस पाईप लाईन टाकण्यात येत असल्याबाबत

**(४) ७१६८ (०४-०४-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीकडून रायगड जिल्ह्यातील उरणपासून शिक्रापूरपर्यंत गॅस वाहून नेण्यासाठी टाकण्यात येणारी पाईपलाईन शेतक-यांच्या जमिनीवर शेतक-यांची कोणतीही परवानगी न घेता तसेच कोणताही मोबदला न देता अतिक्रमण करुन पाईपलाईन टाकण्याचे काम माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास अद्याप या संदर्भात कोणती कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१७-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

उरण-चाकण-शिक्रापूर पाईपलाईन प्रकल्पाचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूचे काम पेट्रोलियम आणि खनिज पाईपलाईन (जमिनीतील वापर करण्याचा हक्क संपादन करणे) अधिनियम, १९६२ अनुसार सुरु आहे. त्यामध्ये पनवेल, उरण, कर्जत व पेण तालुक्यातील

गावांच्या समावेश आहे. जानेवारी, २०१५ पर्यंत पनवेल व उरण तालुकयांत कोणतेही काम सुरु करण्यात आलेले नाही. जे काम सुरु आहे ते सिडको, राज्यमार्ग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या मालकीच्या रस्त्याच्याकडेने सुरु आहे. त्याकरिता संबंधित कंपनीने सदर संस्थांची परवानगी घेतल्याचे उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, उरण शिक्रापूर एलपीजी पाईपलाईन प्रकल्प, पनवेल यांनी दि.६.६.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(२) सदर प्रकल्पाचे काम केंद्र शासनामार्फत उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, उरण शिक्रापूर एलपीजी पाईपलाईन प्रकल्प, पनवेल हे करीत आहेत. त्यांची दि.६.६.२०१५ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनाच्या वतीने संपादन सुरु नसल्याचे कळविले आहे.

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, कर्जत यांच्याकडे जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४८ (७) प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यात १ हजार १८१ गावांचे अद्यापही भुमापन झाले नसल्याबाबत**

**(५) १०४०५ (०७-०४-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन १९६४ पासून भुमापन सुरु आहे यानुसार बुलढाणा जिल्ह्यात सन १९९४ मध्ये २ हजार लोकवस्ती असलेल्या ११३ गावांचे भुमापन करण्यात आले होते, मात्र गेल्या २० वर्षात १ हजार १८१ गावांचे अद्यापही भुमापन झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या आदेशानुसार सन २००१ पासून जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरीय भुमापन अधिकारी यांचेकडे किमान १ गावचे भुमापन करण्याचे जबाबदारी देण्यात आली होती, त्यानंतर शासनाच्या नविन आदेशानुसान सन २०११ पासून प्रत्येक तालुका अधिकाऱ्यांकडे आणखी एक तालुका जोडण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तालुका स्तरीय भुमापन अधिकारी यांच्याकडून ठेवलेले उदिष्ठ पुर्ण करण्यात आले आहे काय,
(४) असल्यास तालुका स्तरीय भुमापन अधिकारी यांचकडून ठरलेले उदिष्ठ पुर्ण झाली नसल्यास शासनाकडून या संदर्भात काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१) बुलढाण जिल्ह्यात सन १९६४ पासून १९९४ पर्यंत २००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकवस्ती असलेल्या ११३ गावांचे गावठाण भूमापन झालेले आहे, हे खरे आहे परंतु, गेल्या २० वर्षात १ हजार १८१ गावांचे अद्यापही भुमापन झाले नसल्याची बाब खरी नाही,
(२) हे खरे नाही.

जिल्ह्यातील गावठाण भूमापन योजना लागू न झालेल्या प्रत्येक तालुक्यातील २००० लोकसंख्येवरील एक गाव नगर भूमापनासाठी हाती घेण्यात आले आहे.

(३) व (४) जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी दि. १८/०७/२०१३ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनेनूसार जिल्ह्यातील गावठाण भूमापन योजना लागू न झालेल्या प्रत्येक तालुक्यतील २००० लोकसंख्येवरील एक गाव नगर भूमापनासाठी हाती घेण्यात आले असून त्यानुसार जिल्ह्यातील एकूण १४ गावांचे नगर भूमापन काम प्रगतीत आहे.

---

**पुणे जिल्ह्यातील तुकडाबंदी कायदा रद्द करण्याबाबत**

**(६) १०८८३ (०४-०४-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील एकापेक्षा अधिक खरेदीदारांना एकत्र करुन ११ गुंठ्यांची खरेदीखते करणाऱ्यांवर अंकुश ठेवण्यासाठी महसूल विभागाने सदर खरेदीखते बेकायदेशीर असल्याचे जानेवारी, २०१५ महिन्यात जाहीर केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १९४७ पासून राज्यात तुकडाबंदी कायदा लागू असल्याने सामान्य नागरिकाला स्वतःचे घर बांधण्यासाठी १-२ गुंठे जमीन खरेदी करता येत नाही त्यामुळे तुकडाबंदी कायदा रद्द करावा अशी मागणी सामान्य नागरीकांनी शासनाकडे वारंवार केलेली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामान्य नागरिकाच्या या मागणीकडे शासनाने गांभीर्याने विचार करुन त्यांना स्वतःच्या घरासाठी १-२ गुंठ्याचे प्लॉट खरेदी करता यावे अशी योजना शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(३) पुणे जिल्ह्याकरीता लागू असणाऱ्या प्रमाणाभूत क्षेत्रात बदल करुन ते १ आर इतके निश्चित करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक १३.८.२०१४ च्या पत्रान्वये शासनास प्राप्त झाला असून तो शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

**कसबा-शिरोळ (जि.कोल्हापूर) गावठाणात प्रॉप्रटी कार्ड वितरीत केले नसून दुय्यम आकार (शेतसारा, ग्रामपंचायती कर) आदि कर वसूल केले जात असल्याबाबत**

**(७) ११२७२ (०४-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १२२ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार कसबा-शिरोळ (जि.कोल्हापूर) गावठाणात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावठाण रहिवाशी विभागात एकूण क्षेत्र ५६.२, शेती विभागात एकूण क्षेत्र ९४.२५ व औद्योगिक विभागात एकूण क्षेत्र ८३.३८९४ असे एकूण २४०.९८९४ क्षेत्राचे प्रॉप्रटी कार्ड वितरीत केले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेत्रात प्रॉप्रटी कार्ड वितरीत केले नसेल तरीही दुय्यम आकार (शेतसारा, ग्रामपंचायती कर) आदि कर वसूल केले जातात हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत व वरील प्रकरणी तातडीने प्रॉप्रटी कार्ड तयार करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६)** :(१), (२) व (३) सदरचे नमूद क्षेत्र हे नगर भूमापन हद्दीच्या बाहेरील असल्यामुळे त्यांची नगर भूमापन मोजणी झालेली नाही. त्यामुळे मिळकत पत्रिका तयार करुन वितरीत करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच सदर प्रकरणी शेतसारा हा कर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वसूल केला जातो.

याबाबत ग्रामपंचायत कार्यालय शिरोळ यांनी दिनांक ०८.०१.२०१५ च्या पत्रान्वये उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरोळ यांना मौजे कसबा शिरोळ येथील नव्यने समाविष्ट केलेल्या गट नंबरमधील मिळकतीची मोजणी करण्याबाबत कळविलेले आहे. त्यंनुषंगाने उप अधीक्षक भूमि अभिलेख, शिरोळ यांनी सदर नगर भूमापन कामासाठीचे येणाऱ्या अंदाजीत खर्चाची रक्कम ग्रामपंचायत शिरोळ यांना दिनांक ११.०५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

या प्रकरणी ग्रामपंचायत, शिरोळ यांचा नगर भूमापन खर्चाबाबतचा ठराव प्राप्त झाल्यानंतर विस्तारीत क्षेत्रातील मिळकतीचे नगर भूमापन करण्याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## पुणे जिल्हयात मोठ्या प्रमाणात टेकडी फोडीचे प्रकार चालू असल्याबाबत

**(८) १२००९ (०४-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील अगळंबे, बाहुली, कुडजे खडकवाडी, मांडवी, सांगरून, आंबी, खानापुर, गोऱ्हे, डोणजे, वरदाडे, कल्याण, कात्रज, खडकवासला, मांगडेवाडी, भिलारेवाडी, तसेच सभोवतालच्या परिसरात मोठ्या प्रमाणात टेकडी फोडीचे प्रकार चालू आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रात्रीच्या काळोखात पोकलेनच्या सहाय्याने डोंगर फोडून तेथे पक्की बांधकामे केली जात आहेत, हे खरे आहे काय,
(३) टेकड्या फोडल्याने डोंगरावरील पाणी रस्त्यावर वाहून येईल मात्र त्याचा निवारा होण्यासाठी मार्ग नसल्याने पावसाळयात पूरसदृश्य स्थिती निर्माण होईल, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, पुढील काळात पावसाच्या दिवसांत कोणतीही मोठी दुर्घटना या टेकड्यांच्या फोडीमुळे होऊ नये म्हणून शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०६-०२-२०१६) :**(१) व (२) सदर गावांमध्ये यापूर्वी अल्प प्रमाणात डोंगर फोड करुन अनधिकृत उत्खनन केलेली काही प्रकरणे आढळून आलेली होती. अशा प्रकरणी नियमानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे. तथापि, रात्रीच्या काळोखात पोकलेनच्या सहाय्याने डोंगर फोडून पक्की बांधकामे केली जात आहे, असे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) पावसाळ्यात पूरसदृश स्थिती निर्माण होऊ नये व टेकड्या फोडण्याने मोठी दुर्घटना होऊ नये म्हणून तहसिलदार, हवेली यांनी सार्वजनिक बांधकाम विभागासह संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत.

---

**सांगली जिल्ह्यामध्ये तुकडेबंदी कायद्याअंतर्गत गुंठेवारी पध्दतीवर बंदी घालून १० गुंठ्यापेक्षा कमी क्षेत्राचे खरेदी विक्री व्यवहाराचे नोंद न करण्याचे आदेश दिल्याबाबत**

**(९) १५२५८ (०७-०४-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सांगली जिल्ह्यामध्ये तुकडेबंदी कायद्याअंतर्गत गुंठेवारी पध्दतीवर बंदी घालून १० गुंठ्यापेक्षा कमी क्षेत्राचे खरेदी विक्री व्यवहाराचे नोंद न करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनेक गोरगरीब व मध्यमवर्गीय लोक एक ते दोन गुंठे जागा खरेदी करून त्यावर घर बांधत असतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील गोरगरीब व मध्यमवर्गीय लोकांना स्वत:च्या जागेत घर बांधण्यासाठी तुकडेबंदी कायद्यात बदल करून गुंठेवारी पध्दती पुन्हा सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणेबाबत व त्यांचे एकत्रिकरण करणेबाबत अधिनियम मध्ये सुधारणा करुन प्रारुप किंवा अंतिम विकास आराखडा किंवा प्रादेशिक आराखडा प्रसिध्द झालेल्या भागात रहिवासी, वाणिज्यिक, औद्योगिक व अन्य बिगरशेती वापरासाठी विनिर्दिष्ट जमिनींना तुकडेबंदी विषयक तरतूदी लागू राहणार नाही अशी तरतूद महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २/२०१६ अन्वये करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयातील महसूली दस्ताऐवजांच्या स्कॅनिंगचे रिको कंपनीला दिलेले काम संथगतीने सुरु असल्याबाबत**

**(१०) १५८०८ (०८-०४-२०१५). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दस्ताऐवज संरक्षित करण्याच्या दृष्टीने त्यांच्या स्कॅनिंगचे रिको कंपनीला दिलेले काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने गेल्या सहा महिन्यात आतापर्यंत अवघ्या ९० हजार कागदपत्रांचेच स्कॅनिंग झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद जिल्हयातील महसूली दस्ताऐवजांच्या स्कॅनिंगचेही काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीला जिल्हा प्रशासनाने वारंवार सूचन/नोटीसा देऊनही स्कॅनिंगच्या कामाची गती वाढलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशत काय आढळून आले, तदनुसार उक्त रिको कंपनीवर शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी औरंगाबाद जिल्ह्यातील जानेवारी, २०१५ अखेर १,३४,०९९ दस्ताऐवजांचे स्कॅनिंग पूर्ण झाले आहे.

प्रस्तुत प्रकरणी औरंगाबाद जिल्ह्यातील स्कॅनिंग करावयाच्या दस्तऐवजांची एकूण संख्या ४०,८३,०९३ इतकी असून स्कॅनिंगची गती वाढविणेबाबत मे.रिको इंडिया कंपनीस दि.१३.१.२०१५ रोजी नोटीस व दि.२७.५.२०१५ रोजी ज्ञापन बजावण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी कामाची गती वाढवली असून दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत एकूण ३९,२१,९०६ दस्ताऐवजांच्या स्कॅनिंगचे काम पूर्ण झाले आहे.

---

**धामणगाव (जि.अमरावती) तालुक्यातील रेती घाटांचा लिलाव झाला नसल्याबाबत**

**(११) १६९७६ (०६-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगाव (जि.अमरावती) तालुक्यातील रेती घाटांचा लिलाव अद्यापही झाला नसल्याने पुढील काळात लिलावाची शक्यता कमी असल्याने तब्बल २१ कोटी रुपयांचा महसूल बुडणार आहे. त्यामुळे चार हजार कुटुंबियांवर उपासमारीची पाळी आल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६)** :(१), (२) व (३) वाळू/रेती निर्गमी धोरणातील तरतुदीनुसार सन २०१४-१५ करिता धामणगाव तालुक्यातील वाळूघाटांचा लिलाव इ.ऑक्शन प्रक्रियेद्वारा आयोजित करण्यात आला होता. तथापि, सदर लिलाव प्रक्रियेत मौजे विटाळा वाळूघाटाकरिताच बोली प्राप्त झाल्याने सदर वाळूघाट मंजूर करण्यात आला. लिलाव प्रक्रियेत अन्य वाळूघाटांकरिता बोली प्राप्त झाली नसल्याने, सदर वाळूघाटांचा लिलाव होऊ शकला नाही. मात्र मार्च, २०१५ मध्ये चार हजार कुटुंबांवर उपासमारीची पाळी आल्याचे निदर्शनास आले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) या तालुक्यात महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमावली १९६६ (विदर्भ विभाग) नियम पालन करीत नसलेल्या परवानाधारकांवर कारवाई करण्याबाबत**

**(१२) १६९७७ (०८-०४-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) या तालुक्यात जमीन दगडखाण/स्टोनक्रशर वापराकरीता अकृषक परवानाधारक महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमावली १९६६ (विदर्भ विभाग) चे नियम पालन करीत नसलेल्या या परवानाधारकांवर कठोर कारवाई करण्याबाबत व त्यांचे परवाने नुतनीकरण करण्यात येऊ नयेत याकरीता मा.स्थानिक लोप्रतिनिधी यांनी तहसिलदार नांदगाव खंडेश्वर, अमरावती यांना दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या निवेदनावर शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६)** :(१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १५ मे २०१५ रोजी तहसीलदार नांदगाव खंडेश्वर यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार नांदगाव खंडेश्वर यांनी तालुक्यातील चारही स्टोनक्रशरची तपासणी केली असता, त्यामध्ये अनियमितता आढळून आली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने कामाची गती वाढावी याकरिता हस्तलिखती सातबारा बंद करुन ऑनलाईन ई-प्रणालीद्वारे राष्ट्रीय भूमी लेख अधुनिकीकरण अभियानांतर्गत ही योजना राबविण्याबाबत**

**(१३) १७२९८ (०६-०८-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कामाची गती वाढावी याकरिता हस्तलिखती सातबारा बंद करुन ऑनलाईन ई-प्रणालीद्वारे राष्ट्रीय भूमी लेख अधुनिकीकरण अभियानांतर्गत ही योजना राबविली आहे परंतू देऊळगावराजा (ता.जि.बुलढाणा) येथे योजना यशस्वीरित्या होऊ शकली नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यात या योजनेचे काम संथ गतीने सुरु असून यावर्षी मोठ्या प्रमाणावर सुरु असून या कार्यालयात मोठ्या प्रमाणात विविध कामासाठी विद्यार्थी, शेतकरी, निराधार व्यक्ती येत असून त्यांना आवश्यक कागदपत्रे मिळत नसल्याने त्यांची गैरासोय होत असल्याने यावर शासन त्वरीत आवश्यक्ती कार्यवाही करणार आहे काय वा करीत आहे ,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१) जमाबंदी आयुकत पुणे यांनी दि. ३०.११.२०१५ पासून देऊळगांव राजा तालुक्यात ऑनलाईन ई-फेरफार आज्ञावलीची अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले होते, त्यानुषंगाने या तालुक्यात ई-फेरफार प्रकल्पाची पुर्ण क्षमतेने सर्व कार्यवाही झालेली आहे. तसेच त्याबाबतचा अद्ययावत अभिलेखाचा डेटा "स्टेट डाटा सेंटर" मुंबई येथे ठेवण्यात आला आहे.

(२) दि.३०.११.२०१५ पासून देवूळगावराजा तालुक्यात ऑनलाईन ई-फेरफार प्रकल्प आज्ञावलीची अंमलबजावणी सुरु करण्यात आली असून त्यापुर्वी नागरीकांना ऑफलाईन पध्दतीने सेवा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या योजनेच्या तयारीच्या कालावधीत विद्यार्थी, शेतकरी, निराधार व्यक्तींना आवश्यक कागदपत्रे मिळविण्याबाबत गैरसोय झाल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच देऊळगांव राजा तालुक्यात १५ महा-ई-सेवा केंद्रामार्फत नागरिकांना सेवा देणेही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खारेगाव, मुंब्रा (जि.ठाणे) येथील पारसिक खाडी किनाऱ्याजवळील पारसिक शासकीय भूखंडावर अतिक्रमण हटविण्यासाठी कार्यवाही केल्याच्या विरोधात व्यावसायिकांनी रेतीबंदर येथे ठिय्या आंदोलन केल्याबाबत**

**(१४) १७८६५ (०६-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारेगाव, मुंब्रा (जि.ठाणे) पारसिक खाडी किना-याजवळील ९० शासकीय भूखंडावर अतिक्रमण हटविण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कार्यवाही सुरु केली असताना येथील व्यावसायिकांनी दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी रेतीबंदर येथे ठिय्या आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्या नुसार संबंधितानवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) तसेच प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही अद्‌याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच ठाण्यातील पारसिक खाडी किना-याचा विकास करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२१-०१-२०१६) :**(१), (२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यातील कळवा आणि मुंब्रा येथील खाडी किनारा अतिक्रमणमुक्त करुन सुशोभिकरण करण्याचा जिल्हा प्रशासनाचा प्रस्ताव असून सदरचे अनधिकृत बांधकाम दुर करणेबाबत संबंधितांना नोटीस देण्यात आल्या आहेत. मात्र खारी मुंब्रा पारसिक रेतीबंदर व्यापारी मंडळाच्या दि. ०२/०४/२०१५ रोजीच्या निवेदनावर शासनाने पुढील निर्णय होईपर्यंत कार्यवाहीस स्थगिती दिली आहे. तथापि, खारेगाव, मुंब्रा (जि.ठाणे) पारसिक खाडी किनाऱ्यावर व्यावसायिकांनी दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी ठिय्या आंदोलन केल्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे कोणताही पत्रव्यवहार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

---

**शासनाने भूमी अभिलेख कार्यालयात दस्त नोंदणी केल्यानंतर त्या नोंदी सात-बारा उताऱ्यामध्ये करण्याचे दृष्टीने ई फेरफार या नविन संगणकीय प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला असल्याबाबत**

**(१५) १८१०७ (०६-०८-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय कदम (दापोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.जयकुमार गोरे (माण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १ एप्रिल, २०१५ पासून भूमी अभिलेख कार्यालयात दस्त नोंदणी केल्यानंतर त्या नोंदी सात-बारा उताऱ्यामध्ये करण्याचे दृष्टीने त्या ई फेरफार या नविन संगणकीय प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रणालीनुसार दुय्यम निंबधक कार्यालयात नोंदणी केल्यानंतर ती तलाठी कार्यालयात नोंदणी होत नसल्याने दस्त नोंदीच्या संदर्भात तलाठी कार्यालयात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून येणाऱ्या अडचणी त्वरीत दूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) ई-फेरफार तथा ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी करण्याचा निर्णय दिनांक २३.१.२०१३ च्या शासन निर्णयाने घेण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु असून अंमलबजावणीमध्ये क्षेत्रीय पातळीवर येणाऱ्या अडचणी विचारात घेऊन आज्ञावलीत आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत तसेच अडचणीचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी (तांत्रिकी मार्गदर्शन) यांच्यासह निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली हेल्प डेस्क ची स्थापना करण्यात आली आहे.

तसेच सदर कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींच्या अनुषंगाने अमलबजावणी करणाऱ्या संस्था व वापरकर्ते यांना सूचना देण्यात येवून सदरच्या दूर करण्यात येत आहेत.

---

## महाराष्ट्र शासनाने अवैध दगडखाणी बंद करण्याचा निर्णय घेतला असतांना नगर तालुक्यात दगडखाणी सुरु असल्याबाबत

**(१६) १८८७२ (०६-०८-२०१५). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने अवैध दगडखाणी बंद करण्याचा निर्णय घेतला असतांना नगर तालुक्यात दगडखाणी सुरु आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व अनुषंगाने अवैध दगड खाणी बंद करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६) :**(१), (२) व (३) मौजे कापूरवाडी, ता.अहमदनगर येथील गौण खनिजाच्या अनधिकृत उत्खननाबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, उत्खन्न झालेल्या क्षेत्राची ई.टी.एस. मशीनद्वारे मोजणी केली असता, २७,३१२ ब्रास दगडाचे अनधिकृत उत्खनन

झाल्याचे आढळून आले आहे. त्याअनुषंगाने संबंधितांवर भा.दं.वि.सहिंता कलम ३७९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदीनुसार दडात्मक कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक पुणे माहामार्गाच्या नाशिक जिल्हयातील विस्तारीकरणात उच्च दाब क्षमतेसह वीज वाक खांब हलविण्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत**

**(१७) १९१५९ (०६-०८-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-पुणे महामार्गाच्या नाशिक जिल्हातील विस्तारीकरणात उच्च दाब क्षमतेसह सर्व वीज वाक खांब हलविण्याचे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्यामुळे सदर ठिकाणी मोठा अपघात होण्याचा धोका निर्माण झाल्याची बाब १० एप्रिल २०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय ?

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०१-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दिघी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील गट नं २०१ मधून अनधिकृत सुरुंग लावून उत्खन्न केल्याबाबत**

**(१८) २०१२० (०६-०८-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दिघी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील गट नं २०१ मधून श्री.इकबाल अ.शकुर गजाली रा.दिघी यांचे मालकीच्या जागेत माती उत्खननासाठी परवानगी देण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माती उत्खनन परवानगीचा गैरवापर करुन सुरुंग लावून दगड फोडण्यात आल्याचे शासनाचे निदर्शनास आल्याने श्री.गजाली यांचे विरुध्द दंडनिहाय कार्यवाही करुन महसूल वसूल करण्यात आला हे खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.अमानुल्ला जैनुद्दिन हद्दादी रा.दिघी यांच्या रहात्या घराजवळ अनधिकृत सुरुंग स्फोट घडविणा-या व्यक्तीकडून नुकसान भरपाई मिळण्याबाबत श्री.हद्दादी यांनी दिनांक ३० एप्रिल, २०१५ वा त्या सुमारास मागणी केली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६)** :(१) व (२) मौजे दिघी (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील गट नं २०१ मधून ५०० ब्रास डबर उत्खननास श्री.इकबाल अ.शकुर गजाली यांना परवानगी देण्यात आली होती. मांत्र, श्री.गजाली यांनी परवानगीपेक्षा १७४ ब्रास डबराचे जास्त उत्खनन व ३८८ ब्रास माती विनापरवानगी उत्खन्न केल्याचे निदर्शनास आल्यावरुन रुपये १०,२५,३३०/- एवढा दंड आकारण्यात आला असून, सदर रकमेच्या वसुलीची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) श्री.अमानुल्ला हद्दादी यांनी दि. २१.२.२०१५ च्या पत्रान्वये सुरुंग स्फोटामुळे घराच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळण्याबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने, तहसिलदार श्रीवर्धन यांनी घराच्या नुकसानीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून घराच्या नुकसानीच्या मुल्यांकन अहवाल मागविलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागरी निवारा परिषद, गोरेगांव पुर्व, मुंबई येथील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थाना स्वतंत्र मालमत्ता प्रमाणपत्र (प्रॉपर्टीकार्ड) मिळण्याबाबत**

**(१९) २०६२० (१०-०८-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी निवारा परिषद, गोरेगांव पुर्व, मुंबई येथील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थाना स्वतंत्र मालमत्ता प्रमाणपत्र (प्रॉपर्टीकार्ड) मिळण्यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी मा.महसूल मंत्री यांना एक लेखी निवेदन दिले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६)** :(१) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही, तथापि, यास विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदायांकडे २० नोव्हेंबर, २०१४ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) नागरी निवारा वसाहतीमधील ११३ सहकारी गृहनिर्माण संस्थासोबत करावयाचा कारारनामा जिल्हाधिकारी कार्यालयाने सर्व गृहनिर्माण संस्थांकडे मान्यतेसाठी पाठविला आहे. सदरचा करारनामा ज्या गृहनिर्माण संस्थांना मान्य आहे अशा ८९ गृहनिर्माण संस्थांसोबत करारनामा करुन तो निष्पादित करणेत आलेला असून त्यापैकी १५ गृहनिर्माण संस्थांच्या नावे स्वतंत्रपणे मिळकत पत्रिका प्रदान करण्यात आलेल्या आहेत.

उक्तप्रमाणे उर्वरित प्रकरणामध्ये करारनामे करण्याची व स्वतंत्रपणे मिळकत पत्रिका उघडण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कणेरी नारपोली व लेखीवली (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील जमीन फेरफार क्रमांक अनुक्रमे ४४४ व ४४५, २४२ व २४९ रद्द करण्याबाबत**

**(२०) २०७०८ (०६-०८-२०१५). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कणेरी नारपोली व लाखीवली (ता. भिवंडी, जि. ठाणे) येथील जमीन फेरफार क्रमांक अनुक्रमे ४४४ व ४४५, २४२ व २४९ रद्द करण्याबाबत तहसिलदार - भिवंडी, मंडळ अधिकारी, उपविभागीय अधिकारी व तलाठी हे शासनाच्या आदेशानुसार कारवाई करीत नसल्याच्या तक्रारी तेथील स्थानिक शेतक-यांनी मा. मुख्यमंत्री व सचिव - महसूल विभाग, जिल्हाधिकारी-ठाणे यांच्याकडे दिनांक २५ फेब्रुवारी २०१५ रोजी वा त्यासुमारास केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मौजे कणेरी, नारपोली व लाखीवाली येथील जमीन फेरफरा रद्द करण्यास दिरंगाई करणा-या अधिकारी व कर्मचा-यांविरुध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६) :**(१) मौजे कणेरी ता,भिवंडी येथील फेरफार क्रमांक ४४४ आणि ४४५, मौजे नारपोली ता.भिवंडी येथील फेरफार क्रमांक ४२७, तसेच मौजे लाखीवली, ता.भिवंडी येथील फेरफार क्रमांक २४२ व २४९ बाबत संबंधितांनी दि. २५/०२/२०१५ च्या पत्रान्वये शासनाकडे तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केले आहेत.

(२) व (३) मौजे नारपोली, ता.भिवंडी येथील तक्रार फेरफार क्रमांक ४२७ बाबत नसुन फेरफार क्रमांक ४४२७ बाबत व मौजे लाखीवली ता.भिवंडी येथील तक्रार फेरफार क्रमांक २४९ बाबत नसून फेरफार क्रमांक ५४९ बाबत आहे. मंजूर फेरफार रद्द करणे ही बाब अर्धन्यायीक स्वरुपाची असल्याने अर्जदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील संबंधित तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करुन दाद मागणे आवश्यक आहे. मौजे लाखीवली, ता.भिवंडी येथील फेरफार क्रमांक २४२ व ५४९ बाबत उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांच्याकडे दाखल फेरचौकशी अर्जाच्या अनुषंगाने उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांनी दि. ०२/०९/२०१५ च्या अर्धन्यायीक आदेशान्वये सदर फेरफार रद्द केले आहेत.

---

## भूमी अभीलेख विभागामध्ये जमीनीचे तुकडे पाडण्याकरिता आवश्यक ती माहिती भूमी अभीलेख कार्यालयाकडे नसल्याबाबत

**(२१) २१३९६ (०६-०८-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या भूमी अभिलेख विभागांतर्गत येणाऱ्या उप अधिक्षक भूमी अभीलेख विभागामध्ये जिरायती शेतीचे ०.८१ आर प्रमाणे तर बागायती शेतीचे ०.२१ आर याप्रमाणे आणि हंगामी बागायती शेतीचे ०.४० आर याप्रमाणे तुकडे पाडण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विभागांतर्गत शेतीच्या जमीनीमध्ये बदल करण्याकरिता जी कारणे असतात ती कारणे नमुना १२ मध्ये नमूद असतात व भूमी अभिलेख कार्यालयाला देण्यात येणारा नमूना ७ मध्ये याबाबतची कोणतीही नोंद उपलब्ध नसते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमीनीचे तुकडे पाडण्याकरिता आवश्यक ती माहिती भूमी अभीलेख कार्यालयाकडे नसल्यामुळे जमीनीचे तुकडे पाडण्याकरिता शेतकऱ्यांना होणारा त्रास कमी करण्यासाठी राज्य शासन सविस्तर धोरण अमलात आणणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जमीनीच्या झालेल्या बदलाबाबतची नमूना १२ मध्ये नोंद असलेली सर्व माहिती नमूना ७ मध्ये उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. एकनाथराव खडसे (१९-०१-२०१६) :**(१) महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियमाचे कलम २ (४) नुसार “तुकडा” या संज्ञेची व्याख्या दिली असून त्यानुसार प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्र असल्यास त्यास “तुकडा” असे संबोधले जाते. सदर अधिनियमाचे कलम ४ नुसार जिल्हा सल्लागार समितीच्या सल्ल्याने असे प्रमाणभूत क्षेत्र ठरवताना जमिनीच्या वर्ग, प्रकार प्रतीनुसार ज्या किमान क्षेत्राचे भूखंडात लागवड केल्यास ती किफायतशीर ठरेल या आधारे अधिनियमाचे कलम ५ नुसार प्रमाणभूत क्षेत्र निर्धारित केले जाते. त्यामुळे जमिनीच्या वर्ग, प्रकार व प्रतीनुसार हे प्रमाणभूत क्षेत्र राज्याच्या विविध भागात बागायत व जिरायतीसाठी वेगवेगळे निर्धारित करण्यात आले आहे.

(२) गाव नमुना नं. १२ मध्ये पिकांखालील क्षेत्राचा तपशील, जलसिंचनाची साधने इ. माहिती नमुद असते. तर नमुना ७ मध्ये सर्व्हे क्रमांकाचे क्षेत्र पोटखराबासह तसेच भोगवटादाराचे नांव आणि कुळ व इतर हक्क असल्यास त्यासंबंधीची नोंद असते.

(३) सहधारकांनी जमीनीच्या विभाजनासाठी अर्ज केल्यानंतर महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम च्या उपबंधास अधीन राहून जमिनीची विभागणी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या तरतुदीनुसार करण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यातील आमगाव, बांभूळगाव गटग्रामपंचायत अंतर्गत येणा-या प्रभागांची पुनर्रचना तलाठ्याने चुकीच्या पध्दतीने केल्याबाबत**

**(२२) २२३८६ (१०-०८-२०१५). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारशिवनी (जि.नागपूर) तालुक्यातील आमगाव, बांभूळगाव गटग्रामपंचायत अंतर्गत येणा-या प्रभागांची पुनर्रचना माहे फेब्रुवारी, २०१५ च्या सुमारास करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थानिक तलाठ्याने चुकीच्या पध्दतीने प्रभाग पुनर्रचना करण्यात आल्याचा आरोप तेथील स्थानिक रहिवाशांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक रहिवाशांनी केलेल्या आरोपानुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) नागपूर जिल्ह्यामधील पारशिवनी तालुक्यातील गटग्रामपंचायत आमगांवची मुदत दिनांक १९.०९.२०१५ रोजी संपत असल्यामुळे राज्य निवडणूक आयोग यांचा प्रभाग रचना व जागेच्य आरक्षणाचा कार्यक्रम, दिनांक १२.०१.२०१५ अन्वये सन २०११ च्या जनगणनेनुसार आमगांव ग्रामपंचायतीची प्रभाग रचना करण्यात आलेली आहे.

तत्कालीन तलाठी यांनी दिलेल्या माहितीवरुन व सन २०११ च्या जनगणेनुसार प्रभागातील लोकसंख्येच्या आधारावर आमगंव ग्रामपंचायतीची प्रभाग क्रमांक १. बाबुरवाडा, प्रभाग क्रमांक-२ अमागांव व प्रभाग क्रमांक-३ बाबुरवाडा अशा ३ प्रभागात विभाजन करुन ७ सदस्य ठरविण्यात आले होते, त्यावर आमगांव, बाबुरवाडा गावातील नागरीकांनी आक्षेप नोदविला होता.

तहसिलदार, पारशिवनी यांचे कडून चौकशी करण्यात आली. त्यानुसार आमगाव ग्रामपंचायतीचे प्रभाग रचना करतांना राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश आणि सन २०११ च्या जनगणने नुसार लोकसंख्येची आकडेवारी विचारात घेवून लोकसंख्येनुसार प्रभाग रचना करण्यात आलेली आहे. लोकसंख्या हा निकष असल्यामुळे सभासदांच्या संख्येत वाढ करता येणार नसल्याने, आक्षेप धारकाचा आक्षेप नियमास धरुन व न्यायसंगत नसल्याचे आढळून आले.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तारदाळ (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील जमीन कल्लाप्पाण्णा आवाडे टेक्स्टाईल पार्क या कंपनीस चुकीच्या पध्दतीने विक्री केल्याबाबत**

**(२३) २३२८३ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारदाळ (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे इलेक्ट्रोस्टील कास्टीग लि. कलकत्ता या कंपनीने सन १९९८-९९ साली कास्टींग पाईप कारखान्यांसाठी खरेदी केलेल्या जमीनीत उद्योग न उभा करता जमीन कल्लाप्पाण्णा आवाडे टेक्स्टाईल पार्क या कंपनीस चुकीच्या पध्दतीने विक्री केल्याप्रकरणी चौकशी करण्याची मागणी स्थानिक विधानसभा सदस्य यांनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कोल्हापूर, विकास आयुक्त उद्योग संचालनालय मुंबई, यांच्याकडे वेळोवेळी अर्ज केला तसेच मुंबई उच्च न्यायालयात रिटपिटीशन नं. ९७४१/२०११ नुसार याचिका दाखल केली असून याचिकेच्या निकालानुसार अप्पर मुख्य सचिव महसूल यांनी अपेक्षित कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमीन घोटाळ्याची चौकशी करुन मुंबई कुळ वहीवाट व शेतजमीन कायदा १९४८ मधील कलम ६३/१ अ चे व परवाना आदेशातील इतर सर्व अटी व शर्तीचे कंपनीने उल्लंघन केलेले असल्याने शेतकऱ्यांच्या जमीनी परत देणेबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६)** :(१), (२), (३) व (४) मे. इलेक्ट्रोस्टील कास्टींग लि.कलकत्ता यांनी मौजे तारदाळ ता.हातकणंगले येथील एकूण ८३.९० हे. जमीन विकास आयुक्त (उद्योग), मुंबई यांचेकडील दिनांक २०/१०/१९९९ चे आदेशान्वये खरेदी केलेली आहे. सदर परवानगीच्या अनुषंगाने सदर घटकाने या जमिनीचा वापर वर नमूद केलेल्या प्रयोजनासाठी मुंबई कुळवहिवाट व शेत जमीन कायदा १९४८ च्या कलम ६३ १अ नुसर पाच वर्षात म्हणजे दिनांक २०/१०/२००४ पर्यंत करणे आवश्यक होते. तथापि सदर जमीन मे. इलेक्ट्रोस्टील कास्टींग लि.कलकत्ता यांनी सदर मुदतीत मंजूर प्रयोजनासाठी वापरलेली नव्हती. मात्र नंतर महाराष्ट्र अधिनियम-कमांक २५/२००५ द्वारे मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ च्या कलम ६३ १अ मध्ये पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १७/५/२००४ पासून सुधारणा करुन खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी वापर करावयाच्या जमिनीसाठी पाच वर्षाची मुदत वाढवून १५ वर्षाची करण्यात आली. सदर सुधारणेमुळे मे. इलेक्ट्रोस्टील कास्टींग लि.कलकत्ता यांना प्रश्नाधीन जमीन मंजूरी प्रयोजनासाठी वापरण्यासाठी दिनांक २१/१०/२०१४ पर्यंत मुदत प्राप्त झाली. दरम्यान सदरची जमीन (Ductile Iron Pipes Tubes & Hollow Profiles of Cast Iron) या औद्योगिक प्रकल्प ऐवजी “इंडस्ट्रियल इस्टेट व इंडिग्रेटेड टेक्सटाईल पार्क” या औद्योगिक प्रयोजनासाठी वापरण्याची मान्यता विकास आयुक्त (उद्योग) यांचे कडील दिनांक १/६/२००६ चे सुधारित आदेशाने देण्यात आली. सदरच्या बदलानंतरही प्रस्तुत कंपनीने त्यामध्ये उद्योग उभा न करता सदरची जमीन “कल्लाप्पाण्णा आवाडे को.ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट” या कंपनीस नोंदणीकृत दस्त दि. १२/०२/२००८ ने विक्री केली आहे व सदर हस्तांतरणास विकास आयुक्त (उद्योग) यांची मान्यता घेतलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी श्री.चंद्रकांत गांधी व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या रिट याचिका क्र. ९७४१/२०११ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि. १३/७/२०१२ रोजी

याचिकाकर्त्यांच्या अर्जावर गुणवत्तेवर निर्णय घेण्याचे निर्देश शासनास देऊन प्रकरण खारीज केले. मा.उच्च न्यायालयाचे वरील निर्देश विचारात घेऊन तत्कालीन अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी सुनावणी घेऊन सदर प्रकरणी वादी पक्षाने केलेला दावा व त्यातील मागणी त्यांना अनुज्ञेय नसल्याचे आदेश दि. १९/३/२०१३ रोजी पारीत केले आहेत.

कल्लाप्पाण्णा आवाडे को.ऑप इंडस्ट्रीयल इस्टेट या संस्थेने सदरच्या जमिनी खरेदीनंतर त्यांस बिगरशेत परवानगी प्राप्त करुन घेतली आहे. प्रचलित तरतूदीनुसार बिगरउपयोजनकर, अकृषीक आकारण्याची रक्कम व वरील रक्कमेवरील व्याज घरुन एकूण रु. १३६.४७ लक्ष एवढी रक्कम भरण्याबाबत तहसिलदार हातकणंगले यांनी नोटीस दिली असून त्याविरुध्द कल्लाप्पाण्णा आवाडे को. ऑप इंडस्ट्रीयल इस्टेट या कंपनीने मे.दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, इचलकरंजी यांचे न्यायालयात दावा दाखल केला असून प्रकरणी न्यायप्रविष्ठ आहे.

---

## रतन इंडिया औष्णीक विद्युत प्रकल्पाद्वारे (जि.अमरावती) शेतकऱ्यांना देण्यात आलेले धनादेश न वटल्याबबत

**(२४) २४०८७ (०६-०८-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रतन इंडिया औष्णीक विद्युत प्रकल्पाद्वारे शेतकऱ्यांचे शेतामधुन टावर लाईल टाकण्यात आली असुन याकरिता मोबदला म्हणून शेतकऱ्यांना देण्यात आलेले धनादेश वटले नसल्याबाबतची तक्रार स्थानिक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे माहे एप्रिल २०१५ वा त्या दरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीचे अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुसार संबंधित दोषी असणाऱ्या विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०१-२०१६) :**(१) सदर काम रतन इंडिया कंपनीकडून करण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कं.लि. अमरावती यांचे तर्फे टॉवर उभारणीचे व वायर रोप ओढण्याचे काम करण्यात आले असून कंपनीने दिलेले चेक बाऊन्स झाल्याबाबतची तक्रार स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे.

(२) होय.

(३) मोर्शी परिसरातील १२ शेतकऱ्यांनी महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनीने नुकसान भरपाई रकमेचे दिलेले धनादेश वटवले गेले नसल्याच्या तक्रारी जिल्हाधिकारी, अमरावती कार्यालयास प्राप्त झाल्या होत्या, त्यापैकी ५ शेतकऱ्यांना कंपनीकडून नव्याने धनादेश देण्यात आले आहेत. उर्वरित ७ शेतकऱ्यांनी कार्यालयीन औपचारिकतेच्या पूर्ततेबाबत तक्रार करुन नवीन धनादेश स्विकारण्यास नकार दिला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमने रोखण्यासाठी शासकीय जमिनीचे सॅटेलाईट (उपग्रह) तंत्रज्ञानाच्या आधारे मोजमाप करण्याबाबत**

**(२५) २६९३८ (१०-०८-२०१५). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिक्रमणे रोखण्यासाठी शासकीय जमिनीचे सॅटेलाईट (उपग्रह) तंत्रज्ञानाच्या आधारे मोजमाप करण्यात येणार असल्याची माहिती दिनांक १८ मे, २०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास सरकारी जमिनी, शेतीची जमिन, निवासी इमारतीसाठी जमिन किती उपलब्ध आहे हे उपग्रहाच्या माध्यमातून स्पष्ट होणार असल्याने जमिनीची सर्व माहिती लगेच मिळू शकणार आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय जमिनीचे अतिक्रमणे रोखण्यासाठी शासनाने सदर कोणती उपाययोजना केली आहे व त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी महसूल विभाग क्र.संकीर्ण-१०११/२१०३/प्र.क्र.६१८/ल-१, दिनांक ०६.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ग्रामीण भागातील जमिनींची पुनर्मोजणी व नकाशांचे डिजिटायझेशन करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून त्यानुषंगाने प्रथम टप्प्यात राज्याच्या प्रत्येक महसूली विभागातील एक जिल्हा याप्रमाणे पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व रायगड या ६ जिल्ह्यांमध्ये ग्रामीण भागातील जमिनींच्या पुनर्मोजणीची कार्यवाही करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

तसेच राज्यातील ग्रामीण भागातील शेतजमिनींची पुनर्मोजणी सॅटेलाईट इमेजरी व इ.टि.एस/डि.जी.पी. एस या हायब्रीड तंत्रज्ञानाचा वार करुन मुळ अभिलेखाचे आधारे करण्याचे नियोजित आहे. पुनर्मोजणीअंती तयार होणाऱ्या नकाशांच्या आधारे जी.आर.एस. प्रणाली विकसित करुन राज्यातील शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे रोखण्यासाठी अशा प्रणालीचा वापर करता येईल. त्याचप्रमाणे निवासी किंवा अन्य विकासासाठी जमीन किती उपलब्ध आहे ही माहिती सुध्द अशा प्रणालीतून उपलब्ध होऊ शकेल.

---

**दक्षिण सोलापूर तालुक्यात राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत ७/१२ ऑनलाईन उपलब्ध होण्याबाबत**

**(२६) २६९७८ (१०-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर तालुक्यात राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम अंतर्गत ७/१२ ऑनलाईन उपलब्ध होण्यासाठी ३१.१२.२०१४ अखेर पर्यंत माहिती अपडेट करण्याचे आदेश प्रांत

अधिकारी यांनी दिले असतानाही दक्षिण सोलापूर तालुक्यात अद्याप फक्त ६० % नोंदणी झाली आहे. असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १००% नोंदणी करण्याचे आदेश असतानाही ४०% नोदणी न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(३) असल्यास, १००% ७/१२ ऑनलाईन उपलब्ध करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) राज्यातील शेत जमिनींचे अधिकार अभिलेख (गाव नमुना नंबर ७/१२) संगणकीकृत होऊन ऑन लाईन पध्दतीने अदययावत व्हावेत या दृष्टीने "ई-फेरफार प्रकल्प" कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक संगणक आज्ञावली राष्ट्रीय सूचना केंद्र, पुणे मार्फत विकसीत करण्यात आली असून राज्यातील विविध तालुक्यातील अधिकार अभिलेखांच्या डॅटा सीडीज् "स्टेट डॅटा सेंटर" वर अपलोड करण्यात येत आहेत.

दक्षिण सोलापूर तालुक्यात दि.२८.०२.२०१५ अखेर सर्व ९० गावांचे फेरफार अद्यावत करुन दि.०४.०३.२०१५ रोजी ट्रायल रनसाठी अद्यावत केलेली डाटा सी.डी. जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे यांचेकडे सादर करण्यात आली. त्यानंतर अंतिम डाटा सी.डी. दि.१३.०५.२०१५ रोजी जमाबंद आयुक्त कार्यालयास सादर करण्यात आली आहे. त्यामुळे ४० % नोंदणी न करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

आतापर्यंत राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी २४७ तालुक्यांच्या डॅटा सीडीज् स्टेट डॅटा सेंटरवर अपलोड करण्यात आलेल्या आहेत. उर्वरीत तालुक्यांच्या डॅटा सीडीज् अपलोड करण्याची तसेच संगणक आज्ञावलीतील किरकोळ तांत्रिक अडचणी दूर करण्याची प्रक्रिया सुरु आहे. दक्षिण सोलापूर तालुक्याच्या संपूर्ण डॅटा सीडीज् अपलोड करण्यात आले असून त्यानुषंगाने ई-फेरफार प्रणाली द्वारे ऑनलाईन फेरफार घेणे व मंजूर करणे या बाबतची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

---

**वर्धा जिल्हयातील महसूल विभागातील सर्व रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत**

**(२७) २७७७१ (१०-०८-२०१५). श्री.रणजित कांबळे (देवळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वर्धा जिल्हयामध्ये उपजिल्हाधिकारी यांचे १२ मंजूर पदांपैकी ४ रिक्त असल्याबाबत तसेच तहसिलदार व नायब तहसिलदार यांच्या मंजूर पदांपैकी अनुक्रमे १२ पैकी ६ व ४३ पैकी ८ पदे माहे जून २०१५ पर्यंत रिक्त आहेत असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त पदे भरण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०१-२०१६) :**(१) सद्यस्थितीत वर्धा जिल्ह्यातील संवर्ग निहाय रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे आहे

उपजिल्हाधिकारी संवर्गाची १३ पदे मंजूर असून त्यापैकी ३ पदे रिक्त आहेत.

तहसिलदार संवर्गाची १३ पदे मंजूर असून त्यापैकी ३ पदे रिक्त आहेत.

नायब तहसिलदार संवर्गाची ४५ पदे मंजूर असून त्यापैकी १६ पदे रिक्त आहेत.

(२) व (३) उपजिल्हाधिकारी व तहसिलदार संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही करण्यात येत आहे.

नागपूर विभागातील नायब तहसिलदार संवर्गाची पदोन्नतीने भरावयाची रिक्त पदे विभागीय स्तरावरुन भरण्यात येतात. सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. मात्र काही पदावन्नत झालेले अव्वल कारकुन यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर येथे न्यायालयीन प्रकरण दाखल केलेले असून न्यायालयाने सदर प्रकरणांत अंतिम अदेशापावतो रिक्त पदे न भरण्याबाबत निर्देश दिले आहेत.

मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ नागपूर यांचेकडे दाखल प्रकरणात अंतिम आदेश पारित होताच तद्नुषंगाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

**जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा येथील उपजिल्हाधिकारी यांची रिक्त पदे त्वरीत भरणे बाबत**

**(२८) २८७८९ (०८-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हाधिकारी कार्यालयातील ४ उपजिल्हाधिका-यांची व तालुका मोताळा येथील तहसिलदाराचे पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रिक्त पदामुळे महसूल प्रशासनातील अनेक कामे रेंगाळलेली व प्रलंबीत असल्याने ग्रामिण भागातील नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०१-२०१६) :**(१) बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत उपजिल्हाधिकाऱ्यांची ३ पदे व जिल्हा पुरवठा अधिकारी हे पद रिक्त आहेत तसेच तहसिलदार मोताळा हे पद रिक्त नाही.

(२) उपजिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदांचा कार्यभार इतर कार्यरत उपजिल्हाधिकारी यांचेकडे सोपविण्यात आली असल्याने नागरीकांची गैरसोय होत नाही,

(३) व (४) उपजिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनस्तरावरुन कार्यवाही सुरु आहे.

---

**अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील मंडळ निरीक्षक व तलाठी यांचेकरिता कार्यालयासह निवासस्थानाच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत**

**(२९) २८९२१ (०८-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील मंडळ निरीक्षक व तलाठी यांचेकरिता कार्यालयासह निवासस्थानाच्या बांधकामास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी यांनी दिनांक २२ जून, २०१५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने लोकप्रतिनीधी यांनी केलेल्या मागणीनुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (३०-०४-२०१६)** :(१) अशा स्वरुपाची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीकडून शासनाकडे दि.२७/०६/२०१५ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे.

(२) व (३) होय.

अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील ७ मंडळ निरिक्षक व २९ तलाठी कार्यालय तथा निवासस्थान इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रकांना व नकाशांना दि.०२ नोव्हेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर बांधकामांसाठी पुरवणी मागणीद्वारे माहे, डिसेंबर, २०१५ च्या अधिवेशनात अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

**मौजे उमरा हिवरा खु. खामगाव जि.बुलडाणा येथील वार्ड क्र. २ मध्ये नवीन गावठाण एफ क्लास शेती गट न. ७६ मध्ये गेले ४० ते ५० वर्षापासून वास्तव्यास असलेल्या लोकांच्या नावे संबंधित जागा करणेबाबत**

**(३०) २९१९३ (०८-०१-२०१६). श्री.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमरा हिवरा खु. खामगाव जि.बुलडाणा येथील श्रीमती चंद्रकांत इंगळे, सरपंच, उपसरपंच व इतर नागरिकानी निवेदनाद्वारे तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांचेकडे दिनांक ०७ ऑक्टोंबर, २०१५ रोजी वार्ड क्र.२ मध्ये नवीन गावठाण एफ क्लास शेती गट न. ७६ मध्ये गेले ४० ते ५० वर्षापासून वास्तव्यास असलेल्या लोकांच्या नावे संबंधित जागा करण्याबाबतची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची जागा त्यांच्या नावावर करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रलंबित असण्याची करणे काय ?

**श्री. एकनाथराव खडसे (२०-०४-२०१६) :**(१), (२) व (३) अशा आशयाचे दि. ०९/१०/२०१५ चे निवेदन उप विभागीय अधिकारी, खामगाव यांच्या कार्यालयास सरपंच, गट ग्राम पंचायत हिवरा खुर्द, मौजे उमरा, (पि.राजा), ता.खामगाव, जि.बुलढाणा यांच्याकडून प्राप्त झाले असून सदर निवेदनान्वये मौजे उमरा (पिं.राजा), ता.खामगाव येथील गट नं. ७६ या एफ-क्लास जमिनीवर निवासी प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमण नियमानुकूल करण्याची मागणी करण्यात आली आहे, नायब तहसिलदार, खामगाव यांनी त्यांच्या दि. २७/०१/२०१६ रोजीच्या आदेशान्वये सदर शासकीय जमीन सार्वजनिक वापराकरिता ग्राम पंयायतीकडे निहित असल्याने सदर जमिनीवर ग्रामस्थांनी निवासी प्रयोजनार्थ केलेले अतिक्रमण नियमानुकूल करता येत नसल्याचा निर्णय दिला आहे.

---

**मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील भूमिअभिलेख कार्यालयात**
**कायमस्वरुपी अधिकारी नसल्याबाबत**

**(३१) २९३४२ (२३-१२-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील भूमिअभिलेख कार्यालयात कायमस्वरुपी अधिकारी नसल्यामुळे व रिक्त जागा शासन भरीत नसल्याने येथील कामाचा सर्व कारभार प्रभारी अधिकाऱ्यांवर पडत असल्याने त्यांच्यावर आलेल्या अधिक ताणामुळे येथील नागरीकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयातील रिक्त जागा तातडीने भरण्याबात शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६) :**(१) सदर पदावरील अधिकारी दिनांक २८/०२/२०१५ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने तालुक्यातील नागरीकांचे कामाचा खोळंबा होवू नये म्हणून सदर पदाचा अतिरिक्त पदभार उप अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगोला यांचेकडे देणेत आला आहे.

(२) व (३) सदरचे पद भरणेकामी नियतकालीक बदलोच्यावेळी प्राधान्याने विचार करण्यात येईल.

---

**राज्यातील महार वतनी जमिनीचे हस्तांतर करण्याबाबत**

**(३२) २९५३७ (२३-१२-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.बसवराज पाटील (औसा),**

**श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महार वतनी जमिनीचे हस्तांतरण व महार वतन जमिनीची विक्री केलेल्या जमिनी पुन्हा मूळ वतनदारांकडे हस्तांतरण करायचे किंवा कसे या संदर्भात अभ्यास करण्यासाठी शासनाने श्री. वसंत गवई यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती केली असून समितीने आपला अहवाल माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडयात शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात कोण-कोणत्या शिफारशी आहेत,व त्यातील कोणत्या शिफारशी मान्य केल्या आहेत

(३) असल्यास, या मान्य केलेल्या शिफारशीची अमंलबजावणी केव्हा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६) :**(१), (२), (३) व (४) महार तवन जमिनीचे हस्तांतरण होऊ नये व अशा जमिनीचे पूर्वीच हस्तांतर झाले असल्यास अशा जमिनी मुळ वतनदारांना पुन:स्थापित करण्याची आवश्यकता तपासणे याबाबतचा सर्वंकष अभ्यास करण्यासाठी शासनाने श्री.व.ल.गवई, भा.प्र.से. (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने शिफारशीसह अहवाल दिनांक ५.८.२०१४ रोजी शासनास सादर केला आहे. समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारसी शासनाच्या विचारधीन आहेत.

---

**कराड (जि.सातारा) तालुक्यात सातबाराचे उत्तारे संगणीकृत देण्यासाठी नेटचे कनेक्शन जोडण्यात न आल्याबाबत**

**(३३) २९५७४ (२३-१२-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यात सातबाराचे उत्तारे संगणीकृत देण्यासाठी गेल्या तीन महिन्यापासून नेटचे कनेक्शन जोडण्यात न आल्याने शेतकऱ्यांना वारंवार जावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना संगणकीकृत सातबाराचे उतारे त्वरीत मिळण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१) होय.
(२), (३) व (४) जमाबंदी आयुक्त, पुणे यांच्या आदेशान्वये कराड तालुक्यात दि.३०.०३.२०१५ पासून ऑनलाईन ७/१२ व ऑनलाईन फेरफार घेण्यास सुरुवात करुन सर्व तलाठ्यांना आयडीया कंपनीचे नेटसेटर उपलब्ध करुन देण्यात आले होते. मात्र ग्रामीण भागांमध्ये नेटसेटरला रेंज नसल्यामुळे माहे सप्टेंबर, २०१५ तसेच त्या सुमारास संगणकीकृत सातबारा वितरीत करतांना काही अडचणी निर्माण झाल्या होत्या.

याबाबत सदरचे आयडीयाच नेटसेटर बंद करण्यात आले असून बीएसएनएल कंपनीचे ब्राडबँन्ड कनेक्शन तलाठी सजा यांना उपलबध करुन देण्यात आले आहेत. तसेच बीएसएनएल सिग्नल उपलब्ध होऊ शकेल अशा चाळीस तलाठी सजांना बीएसएनएल ब्रॉडबॅन्ड कनेक्शन देण्यात आले असून ज्या सजांमध्ये बीएसएनएल ब्रॉडबॅन्ड कनेक्शन कार्यान्वित होऊ शकत नाही अशा तलाठ्यांसाठी तहसिल कार्यालयामध्ये ब्रॉडबॅन्ड सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

आता कराड तहसिल कार्यालय व तलाठी स्तरावर वेळेत संगणकीकृत सातबारा वितरीत करण्यात येत असून सातबारा मागणी करताच उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित तहसिलदार व उपविभागीय अधिकारी कराड यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**मालेगाव (जि.नाशिक) येथील अप्पर जिल्हाधिकारी यांनी लाच घेण्याबाबत केलेली मागणी**

**(३४) २९९५२ (२३-१२-२०१५). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.नाशिक) येथील अप्पर जिल्हाधिकारी यांनी शेतजमिनीचा नजराणा रक्कम न भरणाऱ्यांविरुध्द गुन्हा दाखल न करण्यासाठी ३५ लाख रुपये लाच घेण्याबाबत मागणी केल्याची घटना माहे ऑगस्ट, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शामनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अप्पर जिल्हाधिकाऱ्यांवर लाच मागितल्या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१), (२) व (३) श्री.रामचंद्र बापुराव पवार, तत्का. अप्पर जिल्हाधिकारी मालेगाव, जि.नाशिक यांना लाचलुचपत प्रकरणी दिनांक ०६.०८.२०१५ रोजी २३.०० वाजता अटक करण्यात आली असता ते पोलीस अभिरक्षेत ४८ तासांपेक्षा अधिक काळ राहिल्याने त्यांना अटकेच्या दिनांकापासून निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून पुढील कारवाई करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी झाल्याबाबत

**(३५) २९९९९ (०८-०१-२०१६). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या हिरव्या चाऱ्याची उपलब्धता कमी झाल्याने राज्यातील दुध उत्पादक शेतक-यांना दिवसाला दोन कोटी आणि एका महिन्यात तब्बल ६२ ते ७० कोटी रूपयांचा तोटा झाला असल्याचे माहे सप्टेंबर,२०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुधउत्पादक शेतक-यांना शासनाने निर्णय घेवून आर्थिक मदतीचे पॅकेज देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०२-२०१६) :**(१) चालू वर्षी राज्यात दुष्काळसदृष्य परिस्थितीमुळे पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याच्या उपलब्धतेत कमतरता तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटीच्या दरात मोठ्या प्रमाणावर घसरण आल्यामुळे खाजगी दूध भुकटी प्रकल्पांनी व काही सहकारी दूध संघांनी त्यांचे दुध उत्पादकांचे काही प्रमाणात नुकसान झाले हे खरे आहे.

(२) दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने डिसेंबर, २०१४ ते ऑगस्ट, २०१५ या कालावधीत सहकार क्षेत्रातील अतिरिक्त दूध शासन दराने स्विकृत केले आहे. याशिवाय शासनाने निश्चित केलेल दूध खरेदीचे दर वरकड खर्चासह प्रमाणित मानून राज्यातील सहकारी संघ/संस्थानी हाच दर शेतकऱ्यांना देणे आवश्यक असल्याबाबतचे निदेश शासनाने दि. १०.७.२०१५ रोजी निर्गमित केले आहेत. यासह केंद्र सरकारने दूध भूकटी निर्यातीवर बंद केलेले ५% अनुदान पुन्हा सुरु करुन ते १०% करणे तसेच दुधाकरीता जीवनावश्यक वस्तू अधिनियम कायदा, १९५५ मधील तरतूदीनुसार किमान आधारभूत किंमत निश्चित करण्याबाबत केंद्र शासनास विनंती केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील सुमारे १७ हजार मच्छीमार बायोमेट्रीक कार्डापासून वंचित राहील्याबाबत

**(३६) ३०२४० (०८-०१-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सागरी सुरक्षेत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांना शासनाकडूर बायोमेट्रीक कार्ड दिले जाणार होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना अमलात आल्यापासून रायगड जिल्ह्यातील किती मच्छिमारांना बायोमेट्रीक कार्डची वाटप करण्यात आले,

(३) असल्यास अद्याप कार्डवाटप करण्यात न आलेले किती मच्छिमार या योजनेपासून वंचित आहेत,

(४) असल्यास, ज्या मच्छिमारांना कार्ड वाटप झाले नाही त्यांना किती दिवसात कार्डचे वाटप केले जाणार आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०२-२०१६) :**(१) होय.

(२) एकूण ३३२८३ बायोमेट्रीक कार्डवाटप करण्यात आले.

(३) जिल्हा कार्यालयाकडे ४०३३ अर्ज प्राप्त आहेत.

(४) केंद्र शासनाने नेमलेल्या बायोमेट्रीक कार्ड बनवण्याच्या आय.टी.आय. पल्लकड कोची, केरळ या संस्थेकडून बायोमेट्रीक कार्ड टप्याटप्याने प्राप्त होत असून शासनास प्राप्त झालेली कार्ड्स त्वरीत वितरीत करण्यात येतात.

---

**कोल्हापूर शहरातील मासेमारांना बाहेरुन मत्स्यबीज घ्यावे लागल्याबाबत**

**(३७) ३०३३३ (२३-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरातील रंकाळा तलावातील पाण्याची पातळी कमी झाल्याने तेथील मत्स्यबीज संगोपन केंद्राने ऑगस्ट महिन्यात मत्स्यबीज तलावात न सोडल्याने मासेमारी व्यवसायावर अवलंबून असलेल्या मासेमारांना यंदा बाहेरुन मत्स्यबीज घ्यावे लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केले आहे काय असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे काय कार्यवाही करण्यात आली आहे,वा येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (२८-०१-२०१६) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही. तथापि ऑगस्ट महिन्यात पाऊस न झाल्यामुळे रंकाळा तलावातील पाण्याची पातळी न वाढता ती कमी झाली व परिणामी रंकाळा मत्स्यबीज केंद्रात अपुऱ्या पावसामुळे मत्स्यबीज संगोपन करणे शक्य झाले नाही. प्रस्तुत प्रकरणी कारवाईचा प्रश्न उद्‌भवत नसून उपाययोजना करण्यात आली आहे. मासेमारीवर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांची गैरसोय होऊ नये म्हणून सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय कोल्हापूर कार्यालयाकडे मस्त्यबीजाची मागणी नोंदविलेल्या मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था व खाजगी मत्स्यकास्तकर यांना धोम येथील शासकीय मत्स्यबीज केंद्रातून तसेच नजिकच्या सातारा जिल्ह्यातील शासकीस मत्स्यबीज उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ऑनलाईन सातबारा देण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत**

**(३८) ३१९१९ (२३-१२-२०१५). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ऑनलाईन सातबारा देण्याचा निर्णय शासनाने घेऊनही सातबारा रांगा लावून घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटासह अमरावती जिल्ह्यात ऑन लाईन प्रकियेद्वारे सातबारा उतारे मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१) व (२) राज्यातील शेत जमिनीचे अधिकार अभिलेख (गाव नमुना नंबर७/१२) संगणकीकृत होऊन ऑन लाईन पध्दतीने अद्ययावत व्हावेत या दृष्टीने “ई फेरफार प्रकल्प” कार्यान्वित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर प्रकल्पासाठी आवश्यक संगणक आज्ञावली राष्ट्रीय सूचना केंद्र पुणे मार्फत विकसीत करण्यात आली असून राज्यातील विविध तालुक्यांतील अधिकार अभिलेखाच्या डॅटा सीडीज “स्टेट डॅटा सॅटर” वर अपलोड करण्यात येत आहेत. आतापर्यंत एकूण ३५८ तालुक्यांपैकी २४७ तालुक्यांच्या डॅट सीडीज स्टेट डॅटा सेंटरवर अपलोड करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित तालुक्यांच्या डॅटा सीडीज अपलोड करण्याची तसेच संगणक आज्ञावलीतील किरकोळ तांत्रिक अडचणी दूर करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

अमरावती जिल्ह्याती एकूण १४ तालुक्यांपैकी १३ तालुक्यांच्या अद्ययावत डॅटा सीडीज् अपलोड करण्यात आल्या आहेत व त्यानुषंगाने ई-फेरफार प्रकणालीद्वारे ऑनलाईन फेरफार घेणे व मंजूर करणे याबाबतची प्रक्रिया १३ तालुक्यांमध्ये सुरु करण्यात आली आहे.

उर्वरीत अमरावती या एका तालुक्यातील अधिकार अभिलेखांचे डॅटा अपडेशन करण्याचे काम सुरु आहे, सदर कार्यवाही पूर्ण करुन अमरावती तालुक्यात देखिल ई-फेरफार प्रणालीतून ऑनलाईन फेरफार घेण्याची कार्यपध्दतील ३१ मार्च, २०१६ पर्यंत सुरळीतपणे कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

दरम्यान तालुक्यातील ई सेवा केंद्र तसेच तलाठी यांचेकडून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ उतारे वितरीत करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील परहूर येथील गुरचण जमिनीच्या विक्रीबाबत

**(३९) ३२०२४ (२३-१२-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील मौजे परहूरपाडा येथील गुरचरण जमिनीची सुमारे महिनाभरापूर्वी गुरचणर जमिनीची जिल्ह्याबाहेरी व्यक्तीस विक्री करण्यात आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीची विक्री करण्यापूर्वी पंच व ग्रामस्थांनी सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेतली होती काय,

(३) असल्यास, सहाय्यक धर्मादाय आयुक्तांची परवानगी घेण्यात आली नसल्यास कोणत्या नियमाने जमिनीची विक्री करण्यात आली आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शानाने चौकशी केली आहे काय चौकशीअंती दोषी असणा-या व्यक्तीवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०२-२०१६) :**(१) हे खरे नाही.

अलिबाग तालुकयातीलमौजे परहुरपाडा ता.अलिबाग येथील सरकारी गुरचरण जमिनीची विक्री झाल्याबाबत अधिकारी अभिलेखात नोंदी नाहीत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रायगड जिल्ह्यातील चिरनेर सत्याग्रहामध्ये हुतात्मा झालेले हसुराम बुधाजी घरत यांच्या वारसांना मिळालेल्या जमिनीबाबत

**(४०) ३२१९२ (२३-१२-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील चिरनेर सत्याग्रहामध्ये हुतात्मा झालेले हसुराम बुधाजी घरत यांच्या वारसांना मिळालेल्या जमिनीच्या हक्कावरुन वाद निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आहे आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरत यांच्या वारसांना उरण तालुक्यातील मौजे खोवटे गावात सर्व्हे नं. ३५/२ ची ३८ गुंठे शेतजमीन इनाम म्हणून मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तेव्हापासून घरत कुटुंबीय या जमिनीवर कब्जेदार म्हणून कसत आहेत व त्यांच्या नावावर जमीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भूमाफियांनी शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरुन जमिनीचा फेरफार केल्याचे घरत कुटंबियांनी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, संबंधित घरत कुटुंबियांना इनाम म्हणून मिळालेल्या जमिनीच्या नोंदणीत फेरफारमध्ये बदल करुन त्यांना ताबा कधीपर्यंत देण्यात येणार आहे,

(६) असल्यास, या जमिनीमध्ये फेरफार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्या, विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०२-२०१६) :**(१), (२), (३), (४), (५) व (६) मौजे, धसाखोशी, ता.उरण येथील स.न.३५/२, क्षेत्र ०-३९-० हे आर ही मिळकत हुतात्मा हसुराम बुधाजी घरत यांच्या वारसांकडे चिरनेर जंगल सत्याग्रहात इमान / बक्षीस मिळाल्याबाबत कोणताही ठोस पुरावा नसल्याने आणि सदर जमिनीच्या गाव नमुना नं. ७/१२ मध्ये केवळ पीक पहाणी सदरी नाव दाखल असल्यावरुन जमिनीची मालकी ठरविणे संयुक्तिक नसल्याने, तहसीलदार उरण व उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी संदर्भातील अर्जदारांचा दावा अमान्य केलेला आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केंद्राच्या ग्रीन एनर्जी कॉरिडोर कार्यक्रमानुसार राज्यात पायाभूत पारेषण आराखडा राबविण्याबाबत**

**(४१) ३२७४५ (२३-१२-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्राच्या ग्रीन एनर्जी कॉरिडोर कार्यक्रमानुसार राज्यात पायाभूत पारेषण आराखडा राबविण्यासाठी महापारेषणने आखलेल्या २७ योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या ३६७ कोटीच्या अंदाजीत खर्चास राज्याच्या मंत्रीमंडळाने ३० सप्टेंबर, २०१५ रोजी मंजूरी दिली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनांमधून राज्यात किती मॅगावॅट अतिरिक्त उर्जा निर्माण होणार आहे,
(३) असल्यास, ग्रीन एनर्जी कॉरिडॉर कार्यक्रमासाठी येणाऱ्या खर्चाच्या रकमेपैकी महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या अंतर्गत किती निधी उपलब्ध करण्यात येणार आहे व उर्वरित निधी कोणत्या रुपाने उभा करण्यात येणार आहे वा त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०१-२०१६) :**(१) होय.
(२) राज्यात ५००० मे.वे. क्षमतेचे पवन ऊर्जा प्रकल्प खाजगी प्रवर्तकांमार्फत उभारणेचे प्रस्तावित आहे. या ५००० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पापैकी सुमारे १५०० मे.वॅ. क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वीत झालेले आहेत. उर्वरित ३५०० मे.वॅ. क्षमतेच्या प्रकल्पासाठी सुयोग्यरित्या वीज वहनासाठी ग्रीन एनर्जी कॉरिडॉर अंतर्गत योजना प्रस्तावित केलेल्या आहेत.
(३) सदर योजनेसाठी महापारेषण कंपनीचे २० % भाग भांडवल, नॅशनल ग्रीन एनर्जी फंड अंतर्गत केंद्र शासनाचे ४० % अनुदान व KFW (German Develpoment Bank) यांचे अल्प दरातील ४०% कर्ज या प्रमाणात वित्त उभारणी करण्यात येणार आहे.

---

**औरंगाबाद शहरातील १५ परिक्षा केंद्रावर जिल्हा निवड समितीने तलाठी पदासाठी घेतलेल्या लेखी परीक्षेबाबत**

**(४२) ३३१८१ (२३-१२-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील १५ परिक्षा केंद्रावर जिल्हा निवड समितीने रिक्त असलेल्या १० तलाठी पदासाठी लेखी परीक्षा घेतली असता पुन्हा नव्याने लेखी परिक्षा घेण्यात येणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सतत परिक्षेत होणारा घोळ, परिक्षार्थींचा होणारा गोंधळ, यामुळे अशा वारंवार परिक्षा घेण्यात येत असल्यामुळे पैसे विनाकारण खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सुरळीत व सुनियोजन पध्दतीने परिक्षा घेण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६)** :(१), (२) व (३) औरंगाबाद जिल्हा महसूल आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील १० रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १४ जून, २०१५ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन पात्र उमेदवाराची दिनोक १३.९.२०१५ रोजी लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली होती. तथापि, या कामी नियुक्त करण्यात आलेल्या अभिकर्ता संस्थेने सदर परिक्षेसाठी सदोष उत्तरपत्रिका पुरविल्यामुळे, तांत्रिक कारणास्तव जिल्हा निवड समितीने सदरची परीक्षा रद्द केली, सदर रद्द केलेली लेखी परिक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परीषद, पुणे यांचेकडे सोपवून दिनांक ११.१०.२०१५ रोजी सुरळीत व सुनियोजन पध्दतीने फेर लेखी परिक्षा घेण्यात आली आहे, तसेच संबंधित अभिकर्ता संस्थेचा करारनामा रद्द करण्यात आलेला आहे व रद्द करण्यात आलेल्या परीक्षेचा खर्च संबंधित अभिकर्ता संस्थेकडून वसूल करण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दर्यापूर विहीगांव ता.अंजनगांव सुर्जी येथील २०० के.व्ही. सबस्टेशनचे काम कंत्राटदार सोडून गेल्याबाबत**

**(४३) ३३७४० (०८-०१-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर मतदारसंघातील विहीगांव ता.अंजनगांव सुर्जी येथील २०० के.व्ही. सबस्टेशनचे काम कंत्राटदार सोडून गेल्यामुळे अनेक दिवसांपासून अर्धवट स्थितीत काम प्रलंबित असल्यामुळे दर्यापूर मतदारसंघातील ग्राहकांना योग्य दाबाने विज पुरवठा होत नसल्याने, त्याचा विपरीत परिणाम विजेच्या यंत्र सामुग्रीवर होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी नवीन कंत्राटदार नेमण्याबाबत काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) तसेच दर्यापूर मतदारसंघातील विहीगांव ता.अंजनगांव सुर्जी येथील २०० के.व्ही. सबस्टेशनचे काम कधी पूर्ण करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०१-२०१६) :**(१) दर्यापूर मतदार संघातील विहीगांव ता. अंजनगाव सुर्जी येथील २२० के.व्ही. उपकेंद्राचे काम संबंधित कंत्राटदाराने विहीत वेळत पूर्ण न केल्यामुळे त्या कंत्राटदारांकडून प्रलंबित राहिलेले काम काढून घेण्यात आले आहे.
(२) व (३) सदर उपकेंद्राच्या उर्वरित कामाचे नवीन कंत्राट देण्यासाठीची निविदा प्रक्रीया महापारेषण कंपनीमार्फत सुरु असून या कामाचे कंत्राट दिल्यानंतर नविन कंत्राटदाराकडून लवकरात लवकर काम पूर्ण करुन घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा लागू झाल्यामुळे भाकड गायीच्या समस्याबाबत**

**(४४) ३३९९८ (०८-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा लागू झाल्यामुळे भाकड गायीचं काय करावे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिल्याने राज्य शासनाने भाकड गायीना मोफत चारा पुरविण्याचा महत्वपुर्ण निर्णय माहे ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत मराठवाडयात तीव्र चारा टंचाई भासत असल्याने शासनाकडून चाऱ्यांची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०३-०२-२०१६) :**(१) अंशत: हे खरे आहे.
राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीत भाकड जनावरांसाठी आवश्यकतेनुसार चारा उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात आले आहे.
(२) केंद्र शासनाच्या राष्ट्रीस कृषि विकास योजनेअंतर्गत गतिमान वैरण विकास कार्यक्रमाची अंमलबजावणीसाठी मराठवाडा विभागासाठी रु. ११ कोटी २१ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. चारा निर्मिती प्रकल्पाकरीता मराठवाडयासाठी रु.३ कोटी ८७ लाख निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. शासनाने मराठवाडयातील बीड, लातूर व उस्मानाबाद या जिल्हयातील टंचाईग्रस्त भागात २३ पशुधन छावण्या उघडून पशुधनास छावण्यातील जनावरांना आवश्यक चारा व मोफत औषधोपचाराच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयातील मत्स्य व्यवसाय कार्यालयात अधिकारी पद रिक्त असल्याबाबत

**(४५) ३४६०७ (०८-०१-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मत्स्य व्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील मत्स्य व्यवसाय कार्यालयात अधिकारी पद रिक्त असल्याचे नुकतेच माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्णवेळ अधिकारी नियुक्त करुन मच्छिमारांची होणारी गैरसोय दूर करण्यात यावी अशी मागणी जिल्हा मच्छिमार फेडरेशनने केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी सातत्याने शासनाकडे पत्रव्यवहार तसेच विविध आयुधांच्यामार्फत विधानसभेचे लक्ष वेधूनही अद्यापी शासन स्तरावर कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास चौकशीनुसार सदर पद तात्काळ भरण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, त्याची कारणे काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे (०५-०२-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे,

श्री.भद्रकाली मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था मर्या. मिर्याबांदा ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग या संस्थेने मालवण तालुक्याला पुर्ण वेळ परवाना अधिकारी (वर्ग-३) हे पद भरण्याबाबत विनंती केली होती.

(३) सिंधुदुर्ग जिल्हयातील एकूण ३२ मंजूर पदांपैकी गट-अ व ब संवर्गातील प्रत्येकी १ पद व गट-क संवर्गातील ५ पदे अशी एकूण ७ पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मेळघाट क्षेत्रातील विद्युत पुरवठ्याची अडचण असलेल्या १०० गावांमधील पाणी पुरवठा योजनांसाठी सौर ऊर्जावर आधारीत पंप बसविण्याबाबत

**(४६) ३७१२२ (०८-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट क्षेत्रातील विद्युत पुरवठ्याची अडचण असलेल्या १०० गावांमधील पाणी पुरवठा योजनांसाठी सौर ऊर्जावर आधारीत पंप बसविण्याचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, ग्रामिण

पुरवठा विभाग, अमरावती द्वारा जिल्हाधिकारी , अमरावती यांना दिनांक २५ मे, २०१५ रोजी वा त्यादरम्यान सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मेळघाटातील बहुतांश गावामध्ये नियमित व पुरेशा दाबाचा विद्युत पुरवठा होत नसल्याने सौर ऊर्जावर आधारीत पंप बसविण्यात यावे या आषयाचे एक पत्र लोकप्रतिनीधी अमरावती यांनी मा.ऊर्जा मंत्री यांना दिनांक १ जून, २०१५ वा त्यादरम्याने दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दिलेल्या निवेदनांचे अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०२-२०१६)** :(१) होय.

(२) होय.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजीच पत्रान्वये १०० गावांचे सर्वेक्षण करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. आतापर्यंत एकूण ४८ गावांचे सर्वेक्षण अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांच्याकडून महाऊर्जा कार्यालयास प्राप्त झाले आहेत. सदरच्या अहवालावर पुढील कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील नागपूर, ठाणे, औरंगाबाद आणि शिर्डी ही शहरे सोलर सिटी म्हणून विकसित करण्याबाबत

**(४७) ३८०७२ (०८-०१-२०१६). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागपूर, ठाणे, औरंगाबाद आणि शिर्डी ही शहरे सोलर सिटी म्हणून विकसित करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०२-२०१६)** :(१) नाही. सोलर सिटी ही योजना केंद्र शासनाची आहे व माहे ऑगस्ट, २०१५ पूर्वीच नागपूर, ठाणे, औरंगाबाद व शिर्डी या शहरांना नवीन व नवीनीकरण ऊर्जा मंत्रालयाने सोलर सिटी कार्यक्रमांतर्गत सोलर सिटी म्हणून मान्यता प्रदान केली आहे.

(२) केंद्र शासनाने सोलर सिटीसाठी मंजूर केलेल्या वित्तीय सहाय्याची प्राप्त रक्कम या शहरांना वर्ग करण्यात आली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | शहरांची नावे | निधीची तरतूद (लक्ष रु) | निधीचा (प्राप्त तपशील लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| १ | नागपूर | ४८.९३ | ४.४६ |
| २ | ठाणे | ४९.८४ | १८.८४ |
| ३ | औरंगाबाद | ५०.०० | ७.८६ |
| ४ | शिर्डी | ४३.४८ | १.७४ |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दीपनगर (ता.भुसावळ, जि.जळगाव) येथे नवीन ६६० मेगा वॅट ऊर्जानिर्मिती प्रकल्पास मिळालेल्या मंजुरीबाबत**

**(४८) ३८३२७ (०८-०१-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **उर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दीपनगर (ता.भुसावळ) येथे नवीन ६६० मेगा वॅट क्षमतेच्या ऊर्जानिर्मितीच्या प्रकल्पास मंजुरी मिळून त्याची निविदा पण झालेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजूनही प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) सदर प्रकल्प लवकरात-लवकर सुरु करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०१-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदरहू प्रकल्प ई.पी.सी. (इरेक्शन, प्रोक्युअरमेंट व कन्स्ट्रक्शन) कंत्राट तत्वावर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी निविदाअंतर्गत प्राप्त झालेल्या बोलीचा (Tender) मूल्यमापन अहवाल महानिर्मिती कंपनीच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यातील (जि.बीड) येथिल तलाठयांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत**

**(४९) ३८८५५ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यातील (जि.बीड) येथील तलाठयांची पदे सद्यस्थितीत रिक्त असल्याने शेतकऱ्यांची मोठया प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाकडून अदयापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे (०२-०२-२०१६)** :(१) व (२) सद्यस्थितीत आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यात रिक्त असलेल्या एकूण २० तलाठी पदांचा अतिरिक्त कार्यभार अन्य तलाठयांकडे सोपविला असल्याने, कामे विहित वेळेत पार पाडत आहेत.
सदरहू तलाठी संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी दिनांक १३-९-२०१५ रोजी लेखी परीक्षा घेवून पाटोदा उपविभागातील एकूण ११ उमेदवार पदस्थापनेसाठी वर्ग करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दुष्काळग्रस्त मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना शेतीसाठी मंजूर करण्यात आलेल्या सौर उर्जा पंप वाटपात मराठवाडयावर झालेल्या अन्यायाबाबत**

**(५०) ३९५९८ (१३-०१-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुष्काळग्रस्त मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना केंद्र शासन व राज्य शासनामार्फत १० हजार सौर उर्जा पंप मंजूर करण्यात आलेले असून त्यापैकी मराठवाडयातील जालना जिल्हयाला केवळ १९९ पंप देण्यात येवून उर्वरित पंप विदर्भाला देण्यात आलेले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयामुळे दुष्काळग्रस्त मराठवाडयातील बीड, परभणी, उस्मानाबाद, लातूर, नांदेड, हिंगोली, औरंगाबाद जिल्हयातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाडयातील शेतकऱ्यांना सौरपंपाचे समान वाटप होण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०२-२०१६)** :(१) नाही, राज्यातील जालना, बीड, उस्मानाबाद, नाशिक नंदुरबार, जळगांव, ठाणे, रत्नागिरी आणि रायगड सह विदर्भातील इतरही जिल्ह्यांच्या समावेश सौर कृषिपंप योजनेमध्ये करण्यात आलेला आहे,

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.